पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या डीओटी हॉस्टेलमध्ये ५०० बेडचे कोरोना रुग्णालय

## आयसोलेशन, आयसीयूसाठी हॉस्टेलचे रुग्णालयात रूपांतर; विविध समित्या गठित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन उपाययोजना म्हणून जिल्हाधिकार्‍यांच्या आदेशानुसार शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग व मुलांची वसतिगृहे ताब्यात घेण्यात येणार आहेत. या ठिकाणी कोरोना व संशयित रुग्णांसाठी ५०० बेडचे आयसोलेशन, आयसीयू हॉस्पिटल प्रस्थापित करण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या अतिथीगृहात जिल्हाधिकारी दौलत देसाई



यांच्यासमवेत विद्यापीठ प्रशासनातील अधिकार्‍यांची १ एप्रिल रोजी बैठक झाली. विद्यापीठातील विविध वसतिगृहांची अधिग्रहणाच्या अनुषंगाने पाहणी करण्यात आली. कोरोना विषाणूबाधितांची वाढती संख्या लक्षात घेता अतिरिक्त दक्षतेचा उपाय म्हणून उपचारांसाठी पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक असून, त्यादृष्टीने वसतिगृहांचे अधिग्रहण करण्याची आवश्यकता असल्याचे जिल्हाधिकार्‍यांनी सांगितले होते.

कुलगुरू डॉ. शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाच्या विविध वसतिगृहांत ३,००० विद्यार्थी-विद्यार्थिनी राहतात. लॉकडाऊन उठविल्यानंतर १५ एप्रिलनंतर विद्यार्थी स्थगित केलेल्या परीक्षांसाठी पुन्हा वसतिगृहांत दाखल होतील. त्यांची पर्यायी निवास व भोजन व्यवस्था पान ४ वर ▸

> देशात कोरोना विषाणू संसर्गाच्या अनुषंगाने उद्‌भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा प्रशासनाच्या आवाहनास सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सकारात्मक प्रतिसाद देताना शिवाजी विद्यापीठाने तंत्रज्ञान अधिविभागाचे वसतिगृह अधिग्रहणासाठी उपलब्ध करून दिले आहे. विद्यार्थी व विद्यार्थिनी वसतिगृहांत मिळून ५०० बेडची व्यवस्था आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता आपत्कालीन काळात जिल्हा प्रशासनाला सर्वतोपरी सहकार्य करण्यास विद्यापीठ प्रशासन तत्पर आहे.
>
> **- डॉ. देवानंद शिंदे**, कुलगुरू

# शिवाजी विद्यापीठाच्या डीओटी हॉस्टेलमध्ये ५०० बेडचे कोरोना रुग्णालय

**(पान १ वरून)** करणे अशक्य असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले. विद्यापीठाच्या विद्यार्थी हिताच्या भूमिकेचे स्वागत करीत जिल्हाधिकारी देसाई यांनी अतिरिक्त पर्यायी व्यवस्था म्हणून तंत्रज्ञान अधिविभागाकडील विद्यार्थी व विद्यार्थिनी वसतिगृहे अधिग्रहणासाठी उपलब्ध करण्याविषयी सांगितले. त्याला कुलगुरू डॉ. शिंदे यांनी संमती दिली आहे.

त्याअनुषंगाने विद्यापीठातील विविध वसतिगृहांच्या इमारती ताब्यात घेण्याबाबत करवीर विभागाचे उपविभागीय दंडाधिकारी वैभव नावडकर यांनी ६ एप्रिल रोजी आदेश काढले आहेत. एक हजार बेडच्या रुग्णालयाचा प्रस्ताव विद्यापीठाकडे ठेवण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात विद्यापीठ परिसरातील तंत्रज्ञान अधिविभाग मुला-मुलींचे वसतिगृह (भोजन कक्षासह) तसेच उपलब्ध सोयीसुविधांसह अधिग्रहित करण्यात येणार आहेत. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

परिसरातील मुला-मुलींच्या वसतिगृह इमारतीमधील सर्व खोल्यांमधील साहित्य काढून ट्रंकमध्ये व्यवस्थित ठेवणे, गाद्या गुंडाळून त्यांचा रूम नंबर नमूद करून इतर ठिकाणी व्यवस्थित सुरक्षित ठेवण्यात याव्यात. इमारती स्वच्छ करून दोन दिवसांच्या आत सार्वजनिक बांधकाम विभाग अधीक्षक ताब्यात देण्यात याव्यात. वसतिगृह इमारतीमध्ये कार्यरत कर्मचारीवर्ग व्यवस्थापनासाठी उपलब्ध करून देण्यात यावा. या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय करावी. प्रत्येक खोलीमध्ये वीज कनेक्शन उपलब्ध करून देण्याबरोबरच सीसीटीव्हीचे दैनंदिन व्यवस्थापन करण्यात यावे, असे उपविभागीय दंडाधिकारी यांनी दिलेल्या आदेशात म्हटले आहे.

**१३ गठित समित्यांचे लवकरच कामकाज सुरू**

विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागासह मुला-मुलींचे वसतिगृह ताब्यात घेण्यात येणार आहेत. याच्या नियोजनासाठी सल्लागार समिती, विद्यापीठ व जिल्हा प्रशासन समन्वयक अधिकारी, विशेष दक्षता समिती, निवास व भोजन व्यवस्था, अभियांत्रिकी व पायाभूत सुविधा समिती, वसतिगृहातील खोल्यांमध्ये बेड व इतर साहित्य उपलब्ध करून देण्याबाबतची समिती, खरेदी आणि वित्त, सीसीटीव्ही, जनसंपर्क, आरोग्य, सुरक्षा, वाहन अशा सुमारे १३ समित्या गठित करण्यात आल्या आहेत. लवकरच कामकाजास सुरुवात होईल, असे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सांगितले.

**योग्य ती दक्षता घेऊन साहित्य हलविणार : कुलसचिव**

शासन आदेशानुसार विद्यापीठातील अधिविभाग बंद ठेवण्यात आले आहेत. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे साहित्य खोल्यांमध्ये अडकून पडले आहे. वसतिगृह खाली करताना संबंधित विद्यार्थ्यांचे साहित्य व्यवस्थित काढण्याच्या जिल्हा प्रशासनाकडून सूचना आहेत. त्यानुसार विद्यार्थी प्रतिनिधी, शिक्षक यांच्यासह प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत योग्य ती दक्षता व शूटिंग करून साहित्य हलविण्यात येणार असल्याचे कुलसचिवांनी सांगितले.

# ऑनलाइन गुरुंमुळे संचारबंदीतही अभ्यास

## प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी शोधला पर्याय

**कोल्हापूर टाइम्स टीम**

करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून गेल्या पंचवीस दिवसांपासून शाळा-कॉलेज तसेच शिक्षणसंस्था बंद आहेत. मार्चच्या मध्यावर हा निर्णय घेण्यात आल्यामुळे शेवटच्या टप्प्यातील अभ्यासक्रम पूर्ण करण्याची प्रक्रिया प्राध्यापक आणि विद्यार्थी ऑनलाइन क्लासरूमच्या माध्यमातून पूर्ण करत आहेत. महाविद्यालये, विद्यापीठाच्या परीक्षा रद्द झालेल्या नसल्यामुळे ऑनलाइन सुविधांचा वापर करत अध्यापन आणि अध्ययन प्रक्रिया सुरू आहे.

सोळा मार्चपासून सर्व शाळा, कॉलेज आणि विद्यापीठ बंद आहे. शालेय स्तरावरील परीक्षा रद्द झाल्या. मात्र, महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावरील परीक्षा रद्द झालेल्या नाहीत. तर त्या लांबणीवर पडलेल्या आहेत. करोनाचा धोका कमी झाल्यानंतर या परीक्षा होण्याची शक्यता आहे. विद्यापीठाच्या परीक्षा २७ मार्चपासून सुरू होणार होत्या. त्यापैकी काही विषयांचा सिल्यबस अंतिम टप्प्यामध्ये होते. सुरुवातीला एप्रिलपासून वर्ग सुरू होतील अशी अपेक्षा होती. आता सारे नेमके कधी सुरळीत होईल याची कोणतीच कल्पना नाही.

संचारबंदी काळामध्ये बाहेर जाणे धोक्याचे असल्याने प्राध्यापक व शिक्षकांनी घरातूनच विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम शिकवण्याची प्रक्रिया सुरू केली. यासाठी व्हर्च्युअल क्लासरूम ग्रुप तसेच वेगवेगळ्या माध्यमातून ग्रुप तयार करून अभ्यासक्रम पूर्ण करणे सुरू केले. गेल्या आठ ते दहा दिवसांपासून वेगवेगळ्या कॉलेज तसेच शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचे ऑनलाइन वर्ग सुरू आहेत. विद्यार्थ्यांकडून या स्मार्ट क्लासरुमला चांगला प्रतिसाद मिळत आहे. लांबणीवर पडलेल्या परीक्षांचे वेळापत्रक तयार झाल्यास परीक्षा देण्याची तयारी असावी यासाठीदेखील हा प्रयोग उपयुक्त आहे.



### सांगली आयटीआय देतेय प्रशिक्षणार्थ्यांना ऑनलाइन धडे

सांगली येथील गुणवत्ता पूर्ण प्रशिक्षण देणारा कौशल्य विकास (आयटीआय) विभागांतर्गत येणाऱ्या आयटीआयच्या परीक्षा जुलै महिन्यात होत असतात. त्या पुढे ढकलण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांसाठी ऑनलाइन प्रशिक्षण हा वर्क फ्रॉम होमचा पर्याय निवडला आहे. संस्थेतील सर्व प्राध्यापक व्हॉट्सअॅप ग्रुप्सच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थ्यांशी संवाद साधत आहेत. विविध चाचणी परीक्षा, यूट्यूब, भारत स्किल्स अॅपद्वारे हा उपक्रम राबविला जात आहे. घरी बसून सोडविण्यासाठी प्रश्नपत्रिका संचदेखील दिले आहेत. क्लासमार्कर्स, टेस्ट मॉझ यांसारख्या वेबसाइट्सचा वापर करून मुलांच्याकडून प्रश्नपत्रिका सोडवून घेतल्या जात आहेत.

### शाळाही ऑनलाइन टचमध्ये

पहिली ते नववीपर्यंतच्या परीक्षा शालेय शिक्षण मंत्रालयाने रद्द करण्याच्या सूचना शाळा व्यवस्थापनाला दिले. परीक्षा रद्द करण्यात आल्या असल्या तरी मुलांचा अभ्यास सुरू राहावा यासाठी शाळांनीही उजळणी स्वरुपात विद्यार्थ्यांशी ऑनलाइन संपर्क सुरू ठेवला आहे. शाळांनी वेबसाइटद्वारे विद्यार्थ्यांना काही प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी दिल्या आहेत. सुट्टीच्या काळामध्ये मुलांसाठी अभ्यासाचे वेळापत्रकही इंग्रजी माध्यमाच्या शाळांनी पालकांच्या व्हाट्सअॅप ग्रुपवर पाठवले आहे.

**"**

**आमच्या आयटीआयमध्ये राज्यातून १७६१ प्रशिक्षणार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण घेतात. प्रशिक्षण पूर्ण झाल्या झाल्यानंतर लगेच ही मुले अप्रेंटीशीप करतात. मुलांचे पुढील नुकसान होऊ नये म्हणून त्यांच्याशी संपर्कात आहेत.**

– **यतिन पारगावकर,** प्राचार्य, आयटीआय

**माझ्या मुलाची परीक्षा रद्द झाली असली तरी शाळेने काही प्रश्नपत्रिका मुलांना सोडवण्यासाठी दिल्या आहेत. झालेल्या अभ्यासावर जूनमध्ये एक चाचणी घेण्याचाही निर्णय घेतला आहे.**

– **मेघा थोरवडे,** पालक

**लॉकडाउनमुळे मिळालेल्या सुट्टीचा उपयोग विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन, अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी केला जातो. दिवसभरातील ठराविक वेळ निश्चित करून विद्यार्थ्यांसोबत ऑनलाइन अभ्यासक्रम शिकवला जात आहे.**

– **प्रा. अमित कदम**

# मानसिक स्वास्थ्यासाठी विद्यापीठाची 'हेल्पलाईन'

## लॉकडाऊन काळात समुपदेशन केंद्रनिर्मिती : डॉ. नांदवडेकर यांची माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनाचा कहर वाढल्याने नागरिकांचे मानसिक स्वास्थ्य बिघडत चालले आहे. त्या अनुषंगाने नागरिकांमध्ये अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होत असल्याची बाब लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाने संबंधित नागरिकांसाठी विशेष हेल्पलाईनसेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने समुपदेशन हेल्पलाईन कार्यान्वित करण्यात येणार आहे. गरज भासल्यास प्रत्यक्ष समुपदेशनही करण्यात येणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

कोरोनामुळे देश लॉकडाऊन करण्यात आला आहे. यामुळे नागरिकांच्या मानसिक स्वास्थ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. यामुळे शारीरिक स्वास्थ्यावरही याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. प्राथमिक टप्प्यावरच योग्य, शास्त्रशुद्ध समुपदेशन मिळाले तर व्यक्तीची सकारात्मकता वाढून त्याचा मानसिक आजारापासून बचाव करता येऊ शकेल. ही बाब लक्षात घेऊन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली एमएसडब्ल्यू विभागाचे प्रा. अमोल मिणचेकर यांच्या समन्वयाने नागरिकांच्या मानसिक स्वास्थ्याकरिता फोन-इन समुपदेशन उपक्रम सुरू करण्यात येणार आहे.

विद्यापीठात एमएसडब्ल्यू शिकविणारे शिक्षक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी अशी एकूण ३० जणांची टीम हेल्पलाईनद्वारे संचारबंदी कालावधीत समुपदेशन उपक्रम राबवेल. जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाकडून विद्यार्थ्यांना ओळखपत्रे देण्यात येणार आहेत. सकाळी ९ ते सायंकाळी ६ या कालावधीत हेल्पलाईन कार्यान्वित राहील.

### समुपदेशन आवश्यक : कुलगुरू डॉ. शिंदे

कोरोनामुळे नागरिक दडपणाखाली तसेच भीती, असहायता आणि निराशेच्या भावनेने ग्रस्त आहेत. अशा परिस्थितीत संवाद हा महत्त्वाचा उपाय आणि उपचार आहे. ही बाब लक्षात घेऊन विद्यापीठाने आपल्या एमएसडब्ल्यू अधिविभागाच्या माध्यमातून नागरिकांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी समुपदेशन हेल्पलाईन सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

### हेल्पलाईन नंबर खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| १. प्रा.अमोल मिणचेकर (समन्वयक) | : ९८२२५६७७२० |
| २. विनोद ठिकणे | : ९५५२१२७२०९ |
| ३. मोहिनी देवकर | : ९१४५६०९६४७ |
| ४. सागर अवलक्की | : ८६००७३६१४७ |
| ५. भैय्यासाहेब नलवडे | : ९९७०९६५५७० |
| ६. स्नेहल जगदाळे | : ७८७५१३७५०३ |
| ७. नागेश पवार | : ८७८८३२३५०० |
| ८. रागिणी बालुगडे | : ७४२०९७९९७५ |
| ९. पृथ्वीराज शेटे | : ८८३०८२९३०१ |
| १०.सिद्धांत घोरपडे | : ८८३०९८२८०५ |

# सायबर सुरक्षेबाबत १० रोजी कार्यशाळा

## कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठात आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोरोना प्रतिबंधासाठी पुकारलेल्या लॉकडाऊनमुळे डिजिटल साधनांद्वारे आर्थिक तसेच संवाद व्यवहार वाढले आहेत. त्यामुळे सायबर व फिशिंग ॲटॅकचे प्रमाणही वाढले आहे. हे लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाने येत्या शुक्रवारी (दि. १०) सायबर सिक्युरिटीविषयक एकदिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. विशेष म्हणजे या कार्यशाळेची ऑनलाईन नोंदणी सुरू होताच पहिल्या तासाभरातच देशभरातून सुमारे ८७ इतकी विक्रमी नावनोंदणी झाली आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या सायबर सिक्युरिटी व डाटा सायन्सेस फॅकल्टी डेव्हलपमेंट केंद्राचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी दिली आहे.

डॉ. कामत यांनी दिलेल्या माहितीनुसार, जगभरात कोरोना तथा कोव्हीड-१९ या विषाणूचा उद्रेक झाल्याने अन्य देशांप्रमाणेच भारतामध्येही गंभीर स्थिती लक्षात घेता १४ एप्रिलपर्यंत लॉकडाऊन घोषित करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांना घरात बसून या विषाणूचा प्रतिकार करावा लागत आहे. जवळपास सर्वच आस्थापनांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होमचा सल्ला दिला आहे. त्यामुळे बहुतेक जणांना डिजिटल साधनांचा आधार घेऊनच काम करावे लागत आहे. मोबाईल रिचार्जपासून ते विविध बिल पेमेंटपर्यंत जवळपास सर्वच आर्थिक व्यवहार ऑनलाईन करावे लागत आहेत. या व्यवहारांत जशी वाढ झाली, त्याच प्रमाणात सायबर व फिशिंग हल्ल्यांमध्येही वाढ झाल्याची प्रकरणे सामोरी येत आहेत. त्यामुळे या संदर्भात जनजागृती व योग्य सुरक्षाविषयक दक्षता कशी घ्यावी, याची विस्तृत माहिती देण्याकरिता केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या पंडित मदनमोहन मालवीय शिक्षक व शिक्षणविषयक राष्ट्रीय अभियानांतर्गत शिवाजी विद्यापीठात कार्यरत असलेल्या सायबर सिक्युरिटी व डाटा सायन्सेस फॅकल्टी डेव्हलपमेंट केंद्राच्या वतीने ऑनलाईन कार्यशाळा आयोजित केली आहे.

# 'सायबर सिक्युरिटी'वर विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाने येत्या शुक्रवारी (१० एप्रिल) सायबर सिक्युरिटीविषयक एकदिवसीय ऑनलाइन राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. विशेष म्हणजे, या कार्यशाळेची ऑनलाइन नोंदणी सुरू होताच पहिल्या तासाभरातच देशभरातून सुमारे ८७ इतकी विक्रमी नावनोंदणी झाली आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या सायबर सिक्युरिटी व डाटा सायन्सेस फॅकल्टी डेव्हलपमेंट केंद्राचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी दिली आहे.

डॉ. आर. के. कामत यांनी दिलेल्या माहितीनुसार, कोरोनामुळे नागरिकांना घरात बसून या विषाणूचा प्रतिकार करावा लागत आहे. वर्क फ्रॉम होम, मोबाईल रिचार्जपासून ते विविध बिल पेमेंटपर्यंत जवळपास



सर्वच आर्थिक व्यवहार ऑनलाईन करावे लागत आहेत. हे करताना सायबर व फिशिंग हल्ल्यांमध्येही वाढ झाल्याची प्रकरणे समोर येत आहेत.

यात सायबर सिक्युरिटी, सायबर ॲक्ट्स आदींवर तज्ज्ञ मार्गदर्शन करतील. अधिक माहितीसाठी http://sangnaksuraksha.com/ या वेबसाईटला भेट देण्याचे आवाहन केले आहे.

# कोरोनाच्या लढाईत शिवाजी विद्यापीठ अग्रेसर

## राज्यपालांकडून समाधान : व्हीसीद्वारे कुलगुरू डॉ. शिंदे यांच्याशी संवाद

कोल्हापूर, ता. ७ : 'कोरोना'चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रशासनाच्या बरोबरीने शिवाजी विद्यापीठ कार्यरत आहे. क्वारंटाईन, समुपदेशन याद्वारे विद्यापीठाने या लढाईत सहभाग घेतला असून भविष्यातही अशा प्रकारे कार्यरत राहू, असे आश्वासन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना दिले. व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे (व्हीसी) त्यांनी एकमेकांशी संवाद साधला. जिल्हाधिकारी कार्यालयात ही बैठक झाली.

### 'कोरोना' परीक्षण लॅब...

शिवाजी विद्यापीठात कोरोना परीक्षण करणारी लॅब उभारण्याचा मनोदय कुलगुरू डॉ. शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला. यासाठीचा प्रस्ताव प्रशासन आणि आरोग्य विभागाकडे दिला असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यापीठात लॅबची उभारणी केल्यास अहवाल प्राप्त होण्याचा कालावधी कमी होईल, असे त्यांनी सांगितले.

राज्यपाल कोश्यारी यांनी आज राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंशी संवाद साधला. यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ''विद्यापीठातील हॉस्टेल क्वारंटाईनसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. याशिवाय एनएसएसचे दोनशे विद्यार्थी प्रशासनाला मदत करत आहेत. याशिवाय आणखी जबाबदारी विद्यापीठ उचलेल.''

यावेळी कोश्यारी यांनी परीक्षांची आणि विद्यापीठाच्या कामकाजाची माहिती घेतली. परीक्षा समिती नेमण्यात आली असून त्यांच्या अहवालानंतर परीक्षेच्या तारखा ठरवण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. विद्यापीठाच्या कामाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, परीक्षा नियंत्रक डॉ. गजानन पळसे, उपजिल्हाधिकारी संजय शिंदे उपस्थित होते.

# ‘मेच्या उत्तरार्धात परीक्षा घेण्याची तयारी ठेवा’

**म. टा. प्रतिनिधी**, कोल्हापूर

करोना विषाणू संसर्ग प्रादुर्भाव रोखण्यासाठी संचारबंदी लागू असल्याने लांबणीवर पडलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा मे महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीचे गांभीर्य पाहून



घेण्याबाबत निर्णय घेतला आहे. दरम्यान शिवाजी विद्यापीठाने याबाबत परीक्षा प्रक्रियेच्या नियोजनाची तयारी ठेवावी, अशा सूचना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना दिल्या.

मंगळवारी दुपारी राज्यपाल यांनी राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलगुरूंसोबत उच्च शिक्षण विभागातील परीक्षांसंदर्भात चर्चा करण्यासाठी व्हिडिओ कॉन्फरन्स घेतली. यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षाबाबतचे नियोजन तसेच परीक्षा विभागाची तयारी याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. करोना या विषाणूचे संकट असल्याने परीक्षा घेणे सुरक्षित ठरणार नाही, अशी भूमिकाही या बैठकीत मांडण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे यांनी शिवाजी विद्यापीठांच्या परीक्षा कामकाजाचा अहवाल सादर केला. तसेच याबाबत राज्यातील कुलगुरूंचा समावेश असलेली समिती नेमण्यात आली आहे, या समितीमध्ये डॉ. शिंदे यांचा समावेश आहेत त्यादृष्टीने पदवी व पदव्युत्तर विभागातील परीक्षांचे नियोजन कशा पद्धतीने करता येईल व त्याचा पुढील प्रवेश प्रक्रियेवर कोणताही परिणाम न होता विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळता येईल याबाबत येत्या पंधरा दिवसांत पुन्हा चर्चा करण्यात येणार आहे. तसेच मे महिन्यात नव्याने परीक्षेचे वेळापत्रक करण्याबाबतही राज्यपाल कोश्यारी यांनी सूचना दिली आहे.

# कोरोना टेस्टिंग लॅब उभारण्याची विद्यापीठाची तयारी

## कुलगुरुंकडून जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठामध्ये कोरोना टेस्टींग लॅब उभारण्यात यावी असा प्रस्ताव मंगळवारी शिवाजी विद्यापीठाच्या वतीने जिल्हा प्रशासनाकडे सादर केला आहे. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी जिल्हाधिकारी दौलत देसाई यांच्यासोबत या विषयावर चर्चा केली आहे.

कोरानाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्हा प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. योग्य त्या खबरदारीच्या योजनाही आखल्या जात आहेत. जिल्हा प्रशासनाने केलेल्या आवाहनास प्रतिसाद म्हणून शिवाजी विद्यापीठामध्ये १ हजार बेडचे आयसोलेशन रुग्णालय उभारण्याची तयारीही विद्यापीठाने दर्शविली आहे. याची सुरुवात मंगळवार पासून झाली आहे. तसेच विद्यापीठाच्या वतीने फोन इन समुपदेशन सुविधा सुरु केली आहे. याच पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठामध्ये कोरोना टेस्टीग लॅब उभारण्याची तयारीही विद्यापीठाने दर्शविली आहे. ३ कोटी रुपयांचा प्रस्ताव कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी जिल्हाधिकारी दौलत देसाई यांच्याकडे दिला आहे. प्रशासनाच्या परवानगीनंतर हा प्रस्ताव आरोग्य खात्याकडे पाठविण्यात येणार आहे. राज्य सरकारच्या परवानगीनंतर हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात येणार आहेत. सध्या नॅनो टेक्नॉलॉजी व इतर विभागातील उपलब्ध साधन सामुग्रीच्या सहाय्याने ही लॅब उभारण्याची तयारी विद्यापीठाने दर्शविली आहे.



### हे आहेत निकष...

- टेस्टींग लॅबला आयसीएमआर ने मंजूरी देणे गरजेचे
- एनएबीएलची संमत्ती, मानांकन आवश्यक
- सुसज्ज लॅब असणे आवश्यक
- बीएसएल ३ या संसर्गाचे निदान हाताळणे आवश्यक
- डीएचआर आणि एनआयव्हीच्या मंजूरीने आयसीएमआरकडे प्रस्ताव पाठवावा

## तंत्रज्ञान विभागाच्या वसतिगृहात आयसोलेशन रुग्णालय

**कोल्हापूर :** देशात कोरोना विषाणू संसर्गाच्या अनुषंगाने उद्भवलेल्या अभूतपूर्व आपत्कालीन परिस्थितीमध्ये कोल्हापूर जिल्हा प्रशासनाच्या आवाहनाला शिवाजी विद्यापीठाने सकारात्मक प्रतिसाद दिला. शिवाजी विद्यापीठाने तंत्रज्ञान अधिविभागाचे वसतिगृह आयसोलेशन रुग्णालय उभारण्यासाठी प्रशासनास अधिग्रहणासाठी उपलब्ध करून दिले आहे. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर हे या व्यवस्थेचे समन्वयक अधिकारी म्हणून काम पाहणार असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी मंगळवारी दिली.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची विद्यापीठाच्या अतिथीगृहामध्ये जिल्हाधिकारी. दौलत देसाई यांच्यासमवेत सविस्तर चर्चा केली. यानंतर या सर्वांनी विद्यापीठातील विविध वसतिगृहांची अधिग्रहणाच्या अनुषंगाने पाहणी केली. त्यानंतर त्यांची कुलगुरू, प्र-कुलगुरू यांच्यासमवेत चर्चा झाली.

जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी कोरोना विषाणूबाधितांची वाढती संख्या लक्षात घेता अतिरिक्त दक्षतेचा उपाय म्हणून उपचारांसाठी पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक असून त्या दृष्टीने वसतिगृहांचे अधिग्रहण करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. त्यावर कुलगुरू डॉ. शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाच्या विविध वसतिगृहांत सुमारे ३००० विद्यार्थी-विद्यार्थिनी राहतात. लॉकडाऊन उठविल्यानंतर अर्थात १५ एप्रिलनंतर सदर विद्यार्थी स्थगित केलेल्या परीक्षांसाठी पुन्हा वसतिगृहांत दाखल होतील. त्यांची पर्यायी निवास व भोजन व्यवस्था करणे अशक्य असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले. जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी अतिरिक्त पर्यायी व्यवस्था म्हणून तंत्रज्ञान अधिविभागाकडील विद्यार्थी व विद्यार्थिनी वसतिगृहे अधिग्रहणासाठी उपलब्ध करून देण्यास सांगितले. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी संमती दिली.

तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनी वसतिगृहांत मिळून एकूण ५०० बेडची व्यवस्था आहे. ही वसतिगृहे जिल्हा प्रशासनाला अधिग्रहणासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासनाला सर्वोतोपरी सहकार्य करण्यास विद्यापीठ प्रशासन सदैव तत्पर असल्याचेही कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले.

तरुण भारत Wed, 08 April 2020
https://epaper.tarunbharat.com/c/50750023

लोकमत

# समितीच्या अहवालानंतर परीक्षांचे नवे वेळापत्रक

## राज्यपालांनी साधला कुलगुरुंसमवेत संवाद; कामकाजामध्ये एकवाक्यता ठेवण्याची सूचना

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर 'लॉकडाऊन'मुळे राज्यातील सर्व विद्यापीठाच्या परीक्षा स्थगित केल्या आहेत. लॉकडाऊन उठविल्यानंतर या परीक्षा घेण्यात येणार आहेत. त्याचे नियोजन आणि नियंत्रणासाठी राज्य शासनाने स्थापन केलेल्या सहा सदस्यीय समितीच्या अहवालानंतर परीक्षांचे नवे वेळापत्रक जाहीर होणार आहे. कोरोनाच्या अनुषंगाने विद्यापीठांनी केलेल्या उपाययोजनांची माहिती राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुं कडून मंगळवारी जाणून घेतली. विद्यापीठांच्या कामकाजामध्ये एकवाक्यता ठेवण्याची सूचना देखील त्यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात पाच वाजता राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे कुलगुरुंसमवेत चर्चा सुरु केली. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाने सुरु केलेली कोरोनाबाबतची समुपदेशन, हेल्पलाईन सुविधा, एक हजार बेडच्या आयसोलेशन रुग्णालयासाठी वसतिगृहांची उपलब्धता, सायबर सिक्युरिटीबाबत आयोजित केलेली कार्यशाळा, आदींबाबतची माहिती दिली.

त्याबाबत कुलपतींनी समाधान व्यक्त केले असल्याचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले. आपत्ती व्यवस्थापनासाठीच्या निधीच्या वापराबाबत कुलपतींकडून विचारणा झाली. त्यावर गरज पडल्यास आयसोलेशन रुग्णालय, कोरोनाच्या चाचणीसाठी सुरु केल्या जाणाऱ्या बहुपयोगी प्रयोगशाळा आणि हॅंड सॅनिटायझर तयार करण्यासाठी हा निधी वापरण्याचे नियोजन असल्याची माहिती दिली.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी स्थापन केलेल्या सहा सदस्यीय समितीच्या अहवालानंतर विद्यापीठांच्या परीक्षांचे नवे वेळापत्रक निश्चित केले जाणार असल्याचे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. एस. पळसे उपस्थित होते.



**'कोरोना'बाबतच्या उपाययोजनांबाबत शिवाजी विद्यापीठाने केलेल्या कामगिरीची माहिती कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडून जाणून घेतली. यावेळी शेजारी डॉ. डी. टी. शिर्के, जी. एस. पळसे उपस्थित होते.**

### 'एनएसएस'चे एक हजार स्वयंसेवक

कोरोनाबाबतच्या उपाययोजना राबविण्यासाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली जिल्हा प्रशासनाला राष्ट्रीय सेवा योजनेचे (एनएसएस) एक हजार स्वयंसेवक उपलब्ध करुन दिले जातील. त्यासाठी या विद्यार्थी स्वयंसेवकांच्या पालकांची मान्यता घेतली जाईल, असे कुलगुरु शिंदे यांनी सांगितले.

# विद्यापीठाचे वसतिगृह आयसोलेशन

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : कोरोनाविरुद्धच्या लढ्यासाठी प्रशासनास बळ



कोल्हापूर, ता. ७ : देशात कोरोना विषाणू संसर्गाच्या अनुषंगाने उद्भवलेल्या अभूतपूर्व आपत्कालीन परिस्थितीमध्ये जिल्हा प्रशासनाच्या आवाहनाला सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सकारात्मक प्रतिसाद देताना शिवाजी विद्यापीठाने आपले तंत्रज्ञान अधिविभागाचे वसतिगृह अधिग्रहणासाठी उपलब्ध करून दिले आहे. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व्यवस्थेचे समन्वयक अधिकारी म्हणून काम पाहत आहेत, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांची १ एप्रिलला सकाळी विद्यापीठाच्या अतिथीगृहात जिल्हाधिकारी दौलत देसाई यांच्यासमवेत चर्चा झाली. श्री. देसाई यांनी विद्यापीठातील विविध वसतिगृहांची अधिग्रहणाच्या अनुषंगाने पाहणी केली. देसाई यांनी कोरोना विषाणूबाधितांची वाढती संख्या लक्षात घेता अतिरिक्त दक्षतेचा उपाय म्हणून उपचारांसाठी पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक असून त्या दृष्टीने वसतिगृहांचे अधिग्रहण करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.

कुलगुरू डॉ. शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाच्या विविध वसतिगृहांत सुमारे ३००० विद्यार्थी-विद्यार्थिनी राहतात. लॉकडाऊन उठविल्यानंतर अर्थात १५ एप्रिलनंतर विद्यार्थी स्थगित केलेल्या परीक्षांसाठी पुन्हा वसतिगृहांत दाखल होतील. त्यांची पर्यायी निवास व भोजन व्यवस्था करणे अशक्य असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले. विद्यापीठाच्या विद्यार्थी हिताच्या भूमिकेचे स्वागत करीत जिल्हाधिकारी देसाई यांनी अतिरिक्त पर्यायी व्यवस्था म्हणून वसतिगृहे अधिग्रहणासाठी उपलब्ध करण्याविषयी सांगितले. त्याला डॉ. शिंदे यांनी संमती दिली. तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनी वसतिगृहांत मिळून एकूण ५०० बेडची व्यवस्था आहे. वसतिगृहे अधिग्रहणासाठी दिली.

### सर्वतोपरी सहकार्य

जिल्हा प्रशासनाला सर्वतोपरी सहकार्य करण्यास विद्यापीठ प्रशासन सदैव तत्पर आहे. विद्यापीठातील वरिष्ठ अधिकारी, वसतिगृह रेक्टरांशी चर्चा करून जिल्हा प्रशासनाच्या निर्देशानुसार वसतिगृहे हस्तांतरित करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती व्यवस्था करण्याच्या सूचना कुलगुरूंनी कुलसचिवांना केल्या.

लोकमत

# विद्यापीठात हजार बेडचे आयसोलेशन रुग्णालय

## कोरोनाबाबत जिल्हा प्रशासनाचे नियोजन; तंत्रज्ञान अधिविभागाची वसतिगृहे घेणार ताब्यात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत असल्याने आपत्कालीन उपाययोजना म्हणून शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागाच्या मुला-मुलींच्या वसतिगृहात एक हजार बेडचे आयसोलेशन अथवा आयसीयू रुग्णालय स्थापित करण्याचे नियोजन केले आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या आदेशानुसार प्रशासनाने या वसतिगृहांची पाहणी केली आहे. प्राधान्यक्रमाने या वसतिगृहांच्या इमारती जिल्हा प्रशासन ताब्यात घेणार आहे.

जिल्हा प्रशासनाच्या आवाहनाला सामाजिक बांधीलकीच्या भावनेतून सकारात्मक प्रतिसाद देताना शिवाजी विद्यापीठाने आपले तंत्रज्ञान अधिविभागाचे वसतिगृह अधिग्रहणासाठी उपलब्ध करून दिले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर हे या व्यवस्थेचे समन्वयक अधिकारी म्हणून काम पाहत आहेत, अशी माहिती कुलगुरु डॉ. शिंदे यांनी दिली. कुलगुरु डॉ. शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांची १ एप्रिल रोजी सकाळी विद्यापीठाच्या अतिथिगृहात जिल्हाधिकारी देसाई यांच्यासमवेत चर्चा झाली. देसाई यांनी विद्यापीठातील विविध वसतिगृहांची अधिग्रहणाच्या अनुषंगाने पाहणी केली. उपचारांसाठी वसतिगृहांचे अधिग्रहण करण्याची आवश्यकता असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. त्यावर कुलगुरु डॉ. शिंदे व प्र-कुलगुरु डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाच्या विविध वसतिगृहांत सुमारे ३००० विद्यार्थी-विद्यार्थिनी राहतात. लॉकडाऊन उठविल्यानंतर हे विद्यार्थी स्थगित केलेल्या परीक्षांसाठी पुन्हा वसतिगृहांत दाखल होतील. त्यांची पर्यायी व्यवस्था करणे अशक्य असल्याचे सांगितले. यावर जिल्हाधिकारी यांनी अतिरिक्त पर्यायी व्यवस्था म्हणून तंत्रज्ञान अधिविभागाकडील विद्यार्थी व विद्यार्थिनी वसतिगृहे अधिग्रहणासाठी उपलब्ध करण्याविषयी सांगितले. त्याला डॉ. शिंदे यांनी संमती दिली.

### जिल्हा प्रशासनाला सर्वतोपरी सहकार्य

तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनी वसतिगृहांत मिळून एकूण ५०० बेडची व्यवस्था आहे. ही वसतिगृहे जिल्हा प्रशासनाला अधिग्रहणासाठी उपलब्ध करून देण्यात येतील. उद्‌भवलेल्या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, या आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा प्रशासनाला सर्वतोपरी सहकार्य करण्यास विद्यापीठ प्रशासन सदैव तत्पर असल्याचे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले.

### विद्यार्थी भवनमध्ये व्यवस्था

तंत्रज्ञान अधिविभागाच्या वसतिगृहातील बहुतांश विद्यार्थी आपापल्या घरी गेले आहेत. सध्या असणाऱ्या १२ विद्यार्थ्यांची व्यवस्था ही 'विद्यार्थी भवन'मध्ये केली जाणार आहे.



# विद्यापीठांच्या परीक्षा १५ मेपर्यंत नाहीच

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

'करोना'मुळे उद्भवलेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी मंगळवारी राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंशी विविध विषयांवर चर्चा केली. सध्याच्या परिस्थितीत विद्यार्थ्यांचे कुठलेही शैक्षणिक नुकसान होणार नाही, तसेच विद्यापीठांच्या उन्हाळी परीक्षा सामायिक पद्धतीने घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे, अशी सूचना राज्यपालांनी कुलगुरूंना केली. उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनीदेखील व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे झालेल्या या बैठकीत सहभाग घेतला. या वेळी विद्यापीठांच्या परीक्षा १५ मेपर्यंत होणार नसल्याचे संकेत देण्यात आल्याचे सूत्रांकडून समजते. विद्यापीठांनी आपल्या आकस्मिक निधीचा वापर करोना परीक्षण प्रयोगशाळा सुरू करणे, मास्क व सॅनिटायझर निर्मिती तसेच इतर समाजोपयोगी साहित्य तयार करण्यासाठी करावा, अशीही सूचना राज्यपालांनी या वेळी केली. व्हर्च्युअल क्लासरूम तसेच तंत्रज्ञानावर आधारित इतर ऑनलाइन सुविधांच्या मदतीने विद्यापीठांनी अध्यापनाचे कार्य सुरू ठेवावे, अशीही सूचना राज्यपालांनी या वेळी केली. प्रत्येक विद्यापीठाने आपल्या परिसरात स्थलांतरित कामगार, बेघर व निराश्रित लोकांना भोजन सुविधा देण्याचा प्रयत्न करावा, तसेच विद्यापीठांच्या कुलगुरूंनी आपल्या वेतनाचा काही भाग सरकारला योगदान म्हणून देता येईल का याचा विचार करावा, अशीही सूचना राज्यपालांनी या वेळी केली.



# 'कोरोना' समस्या निवारणासाठी शिवाजी विद्यापीठाची हेल्पलाईन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोरोना विषाणूच्या साथीच्या अनुषंगाने नागरिकांमध्ये विविध प्रकारच्या मानसिक स्वास्थ्याशी निगडित समस्या उद्‌भवत असल्याची बाब लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाने संबंधित नागरिकांसाठी विशेष हेल्पलाईन निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. ही माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली आहे.

जिल्हा प्रशासनाच्या मान्यतेने आणि सहकार्याने सदर समुपदेशन हेल्पलाईन लवकरच कार्यान्वित करण्यात येत आहे. गरज भासल्यास प्रत्यक्ष समुपदेशनही करण्यात येणार आहे. कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, कोरोना विषाणूची साथ आणि त्या अनुषंगाने देशात उद्‌भवलेली अभूतपूर्व परिस्थिती यामुळे नागरिकांच्या मानसिक स्वास्थ्यावर परिणाम होण्याची शक्यता असून मानसिक व्याधीची सुरुवात या कालावधीमध्ये होऊ शकते. त्याचा परिणाम शारीरिक स्वास्थ्यावरही होण्याची शक्यता असते. तथापि, अशा परिस्थितीत जर प्राथमिक टप्प्यावरच योग्य व शास्त्रशुद्ध समुपदेशन मिळाले, तर व्यक्तीची सकारात्मकता वाढून त्याचा मानसिक आजारापासून बचाव करता येऊ शकेल. ही बाब लक्षात घेऊन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या एमएसडब्ल्यू अधिविभागाचे प्रा. अमोल मिणचेकर यांच्या समन्वयाने नागरिकांच्या मानसिक स्वास्थ्याकरिता फोन-इन समुपदेशन उपक्रम राबविण्यात येणार आहे. विद्यापीठात एमएसडब्ल्यू शिकवणारे शिक्षक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी अशी एकूण ३० जणांची टीम हेल्पलाईनद्वारे संचारबंदी कालावधीत योग्य ती दक्षता घेऊन समुपदेशन उपक्रम राबवेल.

# तंत्रज्ञान विभाग वसतिगृह होणार करोना कक्ष

**म. टा. प्रतिनिधी,** कोल्हापूर

देशात करोनाच्या अनुषंगाने उद्भवलेल्या आपत्कालीन काळात जिल्हा प्रशासनाच्या आवाहनाला सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सकारात्मक प्रतिसाद देताना शिवाजी विद्यापीठाने आपले तंत्रज्ञान



अधिविभागाचे वसतिगृह अधिग्रहणासाठी उपलब्ध करून दिले आहे. यानुसार या वसतिगृहात करोना कक्ष स्थापन करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येणार आहे. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर हे या व्यवस्थेचे समन्वयक अधिकारी म्हणून काम पाहात आहेत, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे, प्र- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांची नुकतीच जिल्हाधिकारी दौलत देसाई यांच्यासमवेत सविस्तर चर्चा झाली होती. जिल्हाधिकारी देसाई यांनी विद्यापीठातील विविध वसतिगृहांची अधिग्रहणाच्या अनुषंगाने पाहणी केली. त्यानंतर त्यांची कुलगुरू, प्र-कुलगुरू यांच्यासमवेत चर्चा झाली. जिल्हाधिकारी देसाई यांनी करोनाबाधितांची वाढती संख्या लक्षात घेता अतिरिक्त दक्षतेचा उपाय म्हणून उपचारांसाठी पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक असून त्या दृष्टीने वसतिगृहांचे अधिग्रहण करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले होते.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनी वसतिगृहांत मिळून एकूण ५०० बेडची व्यवस्था आहे. ही वसतिगृहे जिल्हा प्रशासनाला अधिग्रहणासाठी उपलब्ध करून देण्यात येतील.

दरम्यान, विद्यापीठातील वरिष्ठ अधिकारी, वसतिगृहांचे रेक्टर आदींशी चर्चा करून जिल्हा प्रशासनाच्या निर्देशानुसार वसतिगृहे हस्तांतरित करण्याच्या दृष्टीने सर्व आवश्यक ती व्यवस्था करण्याच्या सूचना कुलगुरूंनी कुलसचिवांना केल्या.

पुढारी

# विद्यापीठ करणार सायबर, फिशिंग अॅटॅकबाबत जागृती

- शुक्रवारी ऑनलाईन कार्यशाळा
- ८७ जणांची नावनोंदणी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे डिजिटल साधनांद्वारे आर्थिक व्यवहार, संवाद वाढल्याने सायबर व फिशिंग अॅटॅक होण्याचे प्रमाणही वाढले आहे. याबाबत जागृतीसाठी शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शुक्रवारी (दि.१०) सायबर सिक्युरिटीविषयक एकदिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

जगभरात कोरोना विषाणूचा उद्रेक झाल्याने भारतात गंभीर स्थिती लक्षात घेऊन १४ एप्रिलपर्यंत लॉकडाऊन घोषित करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिक घरात बसून विषाणूचा प्रतिकार करीत आहेत. सर्व आस्थापनांनी कर्मचाऱ्यांना 'वर्क फ्रॉम होम'चा सल्ला दिला आहे. त्यामुळे डिजिटल साधनांचा आधार घेऊनच काम करावे लागत आहे. या व्यवहारात वाढ झाल्याने सायबर व फिशिंग हल्ल्यांमध्ये वाढ झाल्याची प्रकरणे सामोर येत आहेत.

यासंदर्भात जनजागृती व योग्य सुरक्षाविषयक दक्षता कशी घ्यावी, याची माहिती देण्याकरिता केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या पंडित मदनमोहन मालवीय शिक्षक व शिक्षणविषयक राष्ट्रीय अभियानांतर्गत शिवाजी विद्यापीठात कार्यरत सायबर सिक्युरिटी व डाटा सायन्सेस फॅकल्टी डेव्हलपमेंट केंद्रातर्फे ऑनलाईन कार्यशाळा घेण्यात येणार आहे. कार्यशाळेसाठी देशभरातून ८७ जणांनी नावनोंदणी केली आहे.

कार्यशाळेत इन्ट्रोडक्शन टू सायबर सिक्युरिटी, सायबर अॅटॅक्स क्लासिफिकेशन व स्मार्टफोन अँड पेमेंट सिक्युरिटी या विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेबाबत अधिक माहितीसाठी http://sangnaksuraksha.com/ या वेबसाईटला भेट द्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्या सायबर सिक्युरिटी व डाटा सायन्सेस फॅकल्टी डेव्हलपमेंट केंद्राचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी दिली.

लोकमत

सारांश

## विद्यापीठात सायबर सिक्युरिटी कार्यशाळा

कोल्हापूर : कोरोनाबाबत प्रतिबंधक उपाय म्हणून पुकारलेल्या लॉकडाऊनमुळे डिजिटल साधनांद्वारे आर्थिक तसेच संवाद व्यवहार वाढले आहेत. त्यामुळे सायबर व फिशिग अटॅक होण्याचे प्रमाणही वाढले आहे. हे लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाने शुक्रवारी (दि. १०) सायबर सिक्युरिटीविषयक ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित केली आहे. विशेष म्हणजे या कार्यशाळेची ऑनलाईन नोंदणी सुरू होताच पहिल्या तासाभरातच देशभरातून सुमारे ८७ इतकी विक्रमी नावनोंदणी झाली आहे, अशी माहिती सायबर सिक्युरिटी व डाटा सायन्सेस फॅकल्टी डेव्हलपमेंट केंद्राचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी दिली आहे.

# शिवाजी विद्यापीठातर्फे शुक्रवारी ऑनलाइन कार्यशाळा

**कोल्हापूर :** सध्या करोना विषाणू साथीवर प्रतिबंधक उपाय म्हणून पुकारलेल्या लॉकडाऊनमुळे डिजीटल साधनांच्या द्वारे आर्थिक तसेच संवाद व्यवहार वाढले आहेत. त्यामुळे सायबर व फिशिंग अ‍ॅटॅक होण्याचे प्रमाणही वाढले आहे. हे लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाने शुक्रवारी (१० एप्रिल) सायबर सिक्युरिटीविषयक एकदिवसीय ऑनलाइन राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. विशेष म्हणजे या कार्यशाळेची ऑनलाइन नोंदणी सुरू होताच पहिल्या तासाभरातच देशभरातून सुमारे ८७ इतकी विक्रमी नावनोंदणी झाली आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या सायबर सिक्युरिटी व डाटा सायन्सेस फॅकल्टी डेव्हलपमेंट केंद्राचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी दिली आहे. कार्यशाळेबाबत अधिक माहितीसाठी http://sangnaksuraksha.com/ या वेबसाईटला भेट द्यावी, असे आवाहन डॉ. कामत यांनी केले आहे.

# Clarity on exams in 2-3 days: SUK

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** A decision regarding the summer examination of universities across the state will be taken in the next two-three days, said Shivaji University, Kolhapur's (SUK) vice-chancellor Devanand Shinde on Tuesday.

"During a video-conference with chancellor Bhagat Singh Koshyari on Tuesday, the vice-chancellors of the state universities were asked to look for a uniform schedule for the summer exams," Shinde said.

Academic calendar for 2020-21, summer semester exam, e-learning facilities, role of National Service Scheme (NSS) in disaster management and management of disaster funds were the aspects that were discussed during the meeting.

"Since the exam schedule of all public universities is stuck, a solution is likely to be drawn within the next 2-3 days." Shinde said.

# नॅक प्रक्रिया लांबणीवर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे 'नॅक' मूल्यांकन एप्रिलअखेर नियोजित होते. मात्र सध्या करोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या संचारबंदीमुळे ही प्रक्रियादेखील लांबणीवर पडणार आहे. मूल्यांकनासाठी समिती एप्रिलअखेर विद्यापीठात येणार होती. मात्र संचारबंदीमुळे समितीच्या दौऱ्यावर सध्या अनिश्चिततेचे सावट आहे. नॅक मूल्यांकन एप्रिलमध्ये होणार होते.